**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक २५ डिसेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त देशाचं अभिवादन.**
2. **नाताळ सणाचा सर्वत्र उत्साह.**
3. **आगामी महानगर पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपमध्ये अनेक नेत्यांचा प्रवेश.**
4. **मतदार जनजागृतीसाठी नागपूर महापालिका प्रशासनातर्फे अभिनव उपक्रम; ठीक ठिकाणी निगराणी पथके देखील तैनात.**
5. **विश्वविजेती बुद्धिबळपटू नागपूरची दिव्या देशमुख, हिच्या नावाची, अर्जुन पुरस्कारासाठी शिफारस.**

**वाजपेयी जयंती/सुशासन दिवस**

माजी पंतप्रधान दिवंगत, अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त आज, देशभरातून त्यांना आदरांजली वाहिली जात आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु, उपराष्ट्रपती सी.पी.राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्लीतल्या, 'सदैव अटल' या समाधीस्थळी जाऊन वाजपेयी यांना आदरांजली वाहिली. अटल बिहारी वाजपेयींनी आपलं संपूर्ण जीवन, राष्ट्रनिर्माण आणि सु-शासनासाठी समर्पित केलं असं पंतप्रधान मोदी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हणाले. वाजपेयी यांचं व्यक्तिमत्व, कार्य आणि नेतृत्व देशाच्या विकासाच्या कार्यात सदैव मार्गदर्शक राहील अशी भावना त्यांनी व्यक्त केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज, मुंबईत अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त, ‘राष्ट्रनायक यांचा जीवन प्रवास’ या चित्रप्रदर्शनाचं, उद्घाटन केलं. यावेळी भाजपचे राष्ट्रीय सह-संघटन महामंत्री, शिवप्रकाश, मंत्री मंगलप्रभात लोढा, मुंबई भाजप अध्यक्ष अमित साटम उपस्थित होते. नागपुरात देखील, महावितरणच्या काटोल रोड इथल्या विद्युत भवन इथं मुख्य अभियंता, दिलीप दोडके यांनी, अटलजींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करीत, अभिवादन केलं.

**नाताळ**

नाताळचा सण आज सर्वत्र, उत्साहानं साजरा होत आहे. देशभरातल्या चर्चेस आणि प्रार्थना गृहांमध्ये, काल रात्री प्रभू येशू ख्रिस्ताच्या जन्मोत्सवा निमित्त, विशेष प्रार्थनांचं आयोजन, करण्यात आलं होतं. चर्चेसवर रोषणाई करण्यात आली असून, नाताळनिमित्त भेटवस्तू घेऊन येणाऱ्या, सांताक्लॉजच्या प्रतिकृती लक्ष वेधून घेत आहेत. दुकानं, मॉल्स, उपाहारगृहं आणि पर्यटन स्थळांवर गर्दी झाली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि उप-राष्ट्रपती सी.पी.राधाकृष्णन यांनी, देशवासियांना नाताळनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, आज दिल्लीतल्या कॅथेड्रल चर्च ऑफ द रिडेम्पशनमध्ये जाऊन, सामूहिक प्रार्थनेत भाग घेतला. नाताळचा सण, समाजात सद्भावना आणि सलोखा निर्माण करतो असं, त्यांनी आपल्या शुभ संदेशात म्हटलं आहे.

**संसद खेल महोत्सव**

संसद खेल महोत्सव, देशाच्या उभारणीत महत्त्वाची भूमिका बजावत असून, खेळामुळे जय-पराजयाच्या पलीकडे जात, तरुणांमधे खिलाडूवृत्ती रुजत असल्यामुळे, सक्षम आणि शिस्तबद्ध तरूण घडत आहेत असं प्रतिपादन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. संसद खेल महोत्सवाचं दूरस्थ पद्धतीनं, उद्घाटन केल्यानंतर, ते आज बोलत होते. या स्पर्धांमध्ये जे सहभागी होतील ते, आता दहा ते पंधरा वर्षांचे आहेत. त्यामुळे त्यांच्या प्रतिभेला, वाव देणं गरजेचं आहे. संसद खेल महोत्सव अशा खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करून देतो असं पंतप्रधान म्हणाले. सर्व पालकांनी आपल्या पाल्यांना खेळण्यासाठी प्रोत्साहन द्यावं असं आवाहनही, त्यांनी केलं.

**भाजप प्रवेश**

राज्यातल्या २९ महानगरपालिकांचा निवडणूक कार्यक्रम, जाहीर झाल्यानंतर, प्रमुख राजकीय पक्षांच्या हालचाली, वेगानं सुरु झाल्या आहेत. राज्यातली सत्ताधारी महायुती आणि, विरोधकांची महाविकास आघाडी यांच्या, घटक पक्षांमधे स्थानिक पातळीवर वेगवेगळी समीकरणं

मांडली जात आहेत. या पार्श्वभूमीवर, इतर पक्षातील नेते, भाजपमध्ये प्रवेश करत असल्याचं चित्र, पाहायला मिळत आहे. नाशिकमध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे, विनायक पांडे आणि, यतिन वाघ, मनसेचे दिनकर पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे, नितीन भोसले आणि काँग्रेसचे शाहू खैरे यांनी आज, भाजप मध्ये प्रवेश केला. भाजप नेते आणि जलसंपदा मंत्री, गिरीश महाजन यांनी भाजप कार्यालयात आयोजित, कार्यक्रमात त्यांचं स्वागत केलं. तर पुण्यातील तब्बल बावीस नगरसेवकांनी देखील, भाजपमध्ये प्रवेश केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस, शरदचंद्र पवार पक्षाचे निष्ठावंत शिलेदार, मानले गेलेले माजी नगरसेवक, बाळाभाऊ धनकवडे यांचा देखील यात समावेश आहे.

**पीपल्स रिपब्लिकन पार्टी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या, दक्षिण-पश्चिम नागपूर, विधानसभा मतदारसंघातील, प्रभाग क्रमांक ३३ मध्ये, अनुसूचित जातीतील मतदार निर्णायक भूमिका बजावतात. त्यामुळे महायुतीकडून या प्रभागातील राखीव 'अ' प्रवर्गाची जागा पीपल्स रिपब्लिकन पार्टी- पी.रि.पा. करिता सोडण्यात यावी अशी मागणी, करण्यात आली आहे. या संदर्भात पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष, जयदीप जोगेंद्र कवाडे यांनी आज, मुंबई इथं फडणवीस यांच्यासोबत सविस्तर चर्चा केली. या चर्चेदरम्यान, मुख्यमंत्र्यांनी सकारात्मकता दाखविली असल्याची माहिती, जयदीप कवाडे यांनी, प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

**उमेदवारी अर्ज**

नागपूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२५-२६ च्या, अनुषंगानं उमेदवारी अर्ज वाटपाच्या दुसऱ्या दिवशी, एकही उमेदवारी अर्ज दाखल झाला नाही. मात्र काल शहरातील दहा झोनमध्ये, एकूण २,०६० अर्जांची उचल झाली असून, मागील दोन दिवसांत, चार हजार १५७ नाम निर्देशनपत्रांचं वाटप करण्यात आलं. येत्या ३० डिसेंबरपर्यंत, उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत असून, आज २५ डिसेंबर रोजी 'नाताळ' निमित्त सुट्टी असल्यानं, आज अर्ज देणे आणि स्वीकारणे होणार नसल्याचं, मनपानं कळविलं आहे.

**मतदान जागृती/तपासणी**

१५ जानेवारी रोजी, नागपूर महानगर पालिकेसाठी, मतदान होत आहे. ऐकुया त्यासाठीच्या तयारीचा आढावा आमच्या प्रतिनिधीकडून -

***नागपूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदान करण्यासाठी मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी मनपा प्रशासनातर्फे अभिनव उपक्रम राबविण्यता येत आहेत. आज नाताळ सणा चे औचित्य साधून शहरातील ४० ठिकाणी सांताक्लॉजच्या माध्यमातून लोकांना मतदान करण्याचं आवाहन करण्यात आलं. महिला मतदान सक्षम लोकशाही..,दिव्यांग मतदारांचा सन्मान लोकशाहीचा अभिमान...असे मतदान विषयी जनजागृती फलक हाती घेऊन सांताक्लॉजने शहरातील विविध ठिकाणी जनजागृती केली. तत्पूर्वी मनपाच्या छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारतीच्या दालनात मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या हस्ते स्वीप उपक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. तर दुसरीकडे मतदान पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी संपूर्ण निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी शहरातील विविध ठिकाणी स्थिर निगराणी ठेवणारी पथके तैनात करण्यात आली आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, पथकांद्वारे मतदारांना प्रभावित करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या रोकड, मद्य, तसेच प्रतिबंधित पदार्थांच्या वाहतुकीस आळा घातला जाणार आहे. मनपाच्या अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी. आणि उपायुक्त मिलिंद मेश्राम यांनी आज एसएसटी पथकाच्या कार्याची पाहणी केली. दरम्यान महानगरपालिका निवडणुकांच्या प्रचाराची मुदत १३ जानेवारी रोजी सायंकाळी साडे ५ वाजता संपणार आहे. या मुदतीनंतर कुठल्याही प्रसारमाध्यमांद्वारे निवडणूकविषयक जाहिराती प्रसिद्ध करता येणार नाही, असं राज्य निवडणूक आयोगानं स्पष्ट केलं आहे.(आकाशवाणीसाठी वृत्तविभागातून मी नम्रता फलके)***

**ईव्हीएम यंत्र**

राज्य निवडणूक आयोगानं जाहीर केलेल्या, चंद्रपूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२५ कार्यक्रमानुसार, मतदानासाठी वापरण्यात येणारी, ईव्हीएम यंत्रे सुरक्षा कक्षात जमा केली जाणार आहेत. ही प्रक्रिया २६ डिसेंबर रोजी, दुपारी तीन वाजता, महानगरपालिका झोन क्रमांक तीन, बंगाली कॅम्प इथल्या, ईव्हीएम गोदामात पार पडणार आहे. यावेळी सर्व मान्यता प्राप्त राजकीय पक्षांचे प्रतिनिधी आणि  इच्छुक उमेदवारांनी उपस्थित राहावे असं आवाहन, प्रशासनानं केलं आहे.

**दिव्या देशमुख**

भारत सरकारच्या क्रीडा क्षेत्रातील प्रतिष्ठित अशा अर्जुन पुरस्कारासाठी नागपूरची बुद्धिबळपटू विश्वविजेती दिव्या देशमुख हिची शिफारस करण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धांमधील यश आणि राष्ट्रीय पातळीवरील सातत्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या खेळाडूंची अर्जुन पुरस्कारासाठी निवड केली जाते.  भारताची पहिली महिला विश्वविजेती  बुद्धिबळपटू आणि जागतिक कनिष्ठ गट विजेती असा लैकिक तिने प्राप्त केला आहे. याशिवाय  40 पेक्षा अधिक आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या दिव्या देशमुखने आत्तापर्यंत विविध आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये 24 सुवर्ण, ७ रौप्य आणि ५ कांस्यपदक जिंकली आहेत. दिव्या सोबतच भारतीय ऑलिम्पिक संघटनेकडून विविध क्रीडापटूंच्या नावांची शिफारस करण्यात आली आहे.

**समृद्धी महामार्ग**

समृद्धी महामार्गावर, महामार्ग वाहतूक व्यवस्थापन प्रणाली अंतर्गत, अमरावती जिल्ह्यातल्या धामणगाव रेल्वे ते चांदूर रेल्वे इथं, गॅन्ट्री उभारण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत, येत्या २७ ते २९ डिसेंबर दरम्यान, पाच टप्प्यात हे काम होणार आहे.

**हवामान**

विदर्भात आज भंडारा आणि यवतमाळ जिल्ह्यात, १० अंश सेल्सिअस इतक्या सर्वात कमी तापमानाची नोंद करण्यात आली. गडचिरोली इथं १०.२; गोंदिया इथं  १०.५; वर्धा इथं १०.९ तर नागपुर इथं ११.२ अंश सेल्सिअस, इतकं किमान तापमान नोंदवण्यात आल. नागपुरात सातत्यपूर्ण, किमान तापमान नोंदवल्यानंतर, मागील दोन दिवसांपासून, किंचित ढगाळ वातावरणामुळे, किमान तापमानात वाढ झाली आहे.

*****